**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४६/२०१९** **दिनांक ०७ /०६/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०१/०६/२०१९ ते ०७/०६/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०८/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून १२/०६/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१/०६ | ०२/०६ | ०३/०६ | ०४/०६ | ०५/०६ | ०६/०६ | ०७/०६ | | ०८/०६ | ०९/०६ | १०/००६ | ११/०६ | १२/०६ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ६ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३६ | ३५ | ३६ | ३६ | ३६ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २८ | २८ | २७ | २७ | २८ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ६ | ६ | ७ | ६ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८७ | ८९ | ८७ | ८३ | ७२ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४९ | ५३ | ५२ | ५० | ४७ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ६ | ६ | ४ | २ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | नै.प. | नै. | द. | नै.द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३५५८.३ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ११ व १२ जून, २०१९ रोजी पावसाची शक्यता आहे. दिनांक ५ ते ९ जून, २०१९ पर्यंत आकाश ढगाळ राहील.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्हयामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा दर्शविण्यात आला आहे तसेच प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार रायगड जिल्हयामध्ये साधारण कोरडी स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **रोपवाटीका** | • दिनांक ११ आणि १२ जून रोजी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने ज्या ठिकाणी **पाण्याची उपलब्धता असेल** अशाच ठिकाणी भात पेरणीची कामे हाती घ्यावी.<br>• एक एकर क्षेत्रावर लावणी करण्यासाठी रोपवाटिका ४ गुंठे क्षेत्रावर तयार करावी.<br>• गादीवाफ्यावर प्रती आर शेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया व ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट मिसळावे.<br>• जाड दाण्याच्या जातीसाठी हेक्टरी ५० ते ६० कि.ग्रॅ., बारीक दाण्याच्या जातीसाठी हेक्टरी ३५ ते ४० कि.ग्रॅ.आणि संकरीत जातीसाठी २० कि.ग्रॅ. बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी बियाण्यास २.५ ग्रॅम प्रती किलो प्रमाणे थायरम बुरशीनाशक चोळावे.<br>• रोपवाटीकेतील तणांच्या बंदोबस्तासाठी पेरणीनंतर वाफे ओले होताच ऑक्सीडायरजील (६ ई. सी.) प्रती लिटर पाण्यात ३ मि. ली. याप्रमाणे प्रती आर शेत्रावर ५ लिटर या प्रमाणात एकसारखे फवारावे. |
| **नागली** | **रोपवाटीका पूर्वतयारी** | • नागली रोपवाटीकेसाठी निवडक क्षेत्रावर नांगरणी करून प्रती गुंठा क्षेत्रास २५० कि.ग्रॅ. कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत. एक एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी रोपवाटिका ४ गुंठे क्षेत्रावर तयार करावी. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • आंबा फळांची काढणी झाल्यावर घन लागवड (५ x ५ मी. किंवा ६ x ४ मी.) असलेल्या आंबा बागांमध्ये हलक्या स्वरूपाची छाटणी करावी. या मध्ये उंची कमी करणे, फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास छाटणे आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकणे या गोष्टींचा अंतर्भाव करावा. घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी. |
| **नारळ** | **-** | • पावसाळ्यात हवेतील आर्द्रता वाढल्यामुळे नारळामध्ये बुरशीजन्य रोगामुळे फळगळ होण्याची शक्यता असते. फळांचे बुरशीजन्य रोगापासून संरक्षण करण्यासाठी पावसाळा सुरु होण्यापूर्वी १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी व त्यानंतरची फवारणी एका महिन्याच्या अंतराने पाऊस नसताना करावी. |
| **सुपारी** | **-** | • सुपारीवर कोळेरोग ह्या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव पावसाळ्यात हवेतील आर्द्रता वाढल्यामुळे फळांच्या देठावर दिसून येतो व त्यामुळे फळांची मोठ्याप्रमाणात गळ होते. फळांचे बुरशीजन्य रोगापासून संरक्षण करण्यासाठी पावसाळा सुरु होण्यापूर्वी झाडावरील रोगट शिंपुटे, वाळलेल्या झावळ्या गोळा करून नष्ट करावेत व पानांचा बेचक्यात १ टक्का बोर्डोमिश्रणाच्या ३ ते ४ फवारण्या एका महिन्याच्या अंतराने कराव्यात तसेच कोळेरोगाच्या यशस्वी नियंत्रणासाठी ०.३ टक्के एलिएट (फॉसिटील एल ८० टक्के पाण्यात मिसळणारी पावडर ३ ग्रम प्रती १ लिटर पाण्यात) या बुरशीनाशकाचे द्रावण सुपारी झाडांना मुळावाटे पाच हप्त्यात देण्यात यावे. यासाठी सुपारी झाडाची अन्न घेणारी दोन मुळे निवडून त्याची टोके कापून घ्यावीत. वरील प्रमाणे बुरशीनाशकाचे द्रावण तयार करून प्रत्येकी १०० मि. ली. या प्रमाणात दोन प्लास्टिक पिशव्यात भरून कापलेली मुळे पिशवीत व्यवस्थित बुडवून पिशव्या मुळाला बांधून घ्याव्यात. सदरच्या बुरशीनाशकाचा पहिला हप्ता पावसाळा सुरु होण्यापूर्वी देण्यात यावा. |

| | | |
|---|---|---|
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे/कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या / शेडच्या  बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |